नूतन विद्या प्रसारक मंडळाचे,

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

लासलगाव – 422306, ता. निफाड, जि. नाशिक.

(डॉ. आदिनाथ सोरे)
प्राचार्य

दिनांक 10/04/2023

विद्यार्थिनी मंच उद्घाटन समारंभ

गुरुवार दिनांक 13/04/2023 रोजी "विद्यार्थिनी मंच" चा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे. या प्रसंगी **मा.सौ.विजयश्री चंद्रशेखर भावसार** याचे **"यशस्वी उद्योजिका होण्याची गुरुकिल्ली"** या विषयावर व्याख्यान होणार आहे. हा कार्यक्रम विद्यार्थिनींसाठीच असल्यामुळे सर्व विद्यार्थिनीची उपस्थिती आवश्यक आहे.

(डॉ. आदिनाथ सोरे)
प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
लासलगांव -४२२३०६, (जि.नाशिक)

(प्रा. अहिरे उषा)
विद्यार्थिनी मंच अध्यक्ष

यशस्वी महिलांचा आदर्श विद्यार्थिनींनी घ्यावा : भावसार

सकाळ वृत्तसेवा

लासलगाव, ता. १३ : यशस्वी उद्योजिका व्हायचे असेल, तर आपण समाजातील वेगवेगळ्या यशस्वी महिलांचा आदर्श नजरेसमोर ठेवून काम करायला हवे. असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजिका विजयश्री भावसार यांनी येथे केले.

येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (ता. १३) उद्घाटन समारंभानिमित्त सौ. भावसार यांचे व्याख्यान झाले. या वेळी त्यांनी 'यशस्वी उद्योजिका होण्याची गुरुकिल्ली' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांच्या विकासात आई-वडिलांचा पालक म्हणून सहभाग कसा महत्वपूर्ण आहे, हे देखील त्यांनी अधोरेखित केले. उद्योगाची सुरवात करताना आधी आपल्या आवडीचे क्षेत्र ओळखून त्याचे उद्योगात रूपांतर करता येते का, हे बघितले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. अध्यक्षिय मनोगतात प्राचार्य डॉ. मोरे यांनी, विद्यार्थिनी मंचचा लाभ करून घेण्याचे आवाहन केले. तसेच, स्त्री सक्षमीकरणासाठी विद्यार्थिनी मंचसारख्या विधायक मंचाची गरज असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. प्रा. उषा अहिरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अश्विनी पवार यांनी परिचय करून दिला. ऋतुजा सोमवंशी या विद्यार्थिनिने सूत्रसंचालन केले. प्रतीक्षा काळे हिने आभार मानले.

उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे, प्रा. डॉ. उज्वला शेळके, प्रा. शितल केदारे, प्रा. ऐश्वर्या कुमावत, प्रा. पूनम आहेर, प्रा. माधुरी साबळे, प्रा. अनित चव्हाण यांनी संयोजन सहकार्य केले

लासलगाव महाविद्यालयात व्याख्यान



लासलगाव : उद्योजिका विजयश्री भावसार यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अदिनाथ मोरे. शेजारी उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे, प्रा. डॉ. उज्वला शेळके.




नूतन विद्याप्रसारक मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासलगाव ता. निफाड, जि. नाशिक.
विद्यार्थिनी मंच उद्घाटन समारंभ
दि. १३/०४/२०२३
प्रमुख वक्ते:- श्रीमती विजयश्री भावसार
Arts, Commerce and Science College




GPS Map Camera
Pimpalgaon Najik, Maharashtra, India
563Q+4H5, Pimpalgaon Najik, Maharashtra 422306, India
Lat 20.152817°
Long 74.23891°
13/04/23 01:32 PM GMT +05:30
Google

